गुरुवार दि. ११ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनसेवकता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ‘मेडिसिटी’द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार - मुख्यमंत्री

### एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था विकसित करण्यासाठी १.२ अब्ज अमेरिकी डॉलरच्या गुंतवणुकीची बांधिलकी

क्लीव्हलँड, ओहायो जिमाका – ‘मेडिसिटी’ ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या ‘हील इन इंडिया’ या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर



मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ‘‘आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषतः डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले.‘‘

भारताचे पहिले

## मोठ्या कंपन्यांना कर्ज देताना बँका उदार, पण सामान्यांना मात्र त्रास: सर्वोच्च न्यायालयाचे खडे बोल

**जालना - प्रतिनिधी**

‘‘मोठ्या कंपन्यांना कोट्यवधी रुपयांचे कर्ज देताना बँका अत्यंत सहज आणि उदार दृष्टिकोन ठेवतात, परंतु जेव्हा सामान्य नागरिक वैयक्तिक गरजांसाठी छोटे कर्ज मागायला येतात, तेव्हा त्यांच्यावर अत्यंत कठोर नियम लादले जातात आणि ही प्रक्रिया अनेकदा छळाच्या सीमेपर्यंत पोहोचते,‘‘ अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने बँकिंग व्यवस्थेवर तीव्र ताशेरे ओढले आहेत. न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने स्टेट बँक ऑफ इंडिया () संबंधित एका प्रकरणात ही महत्त्वपूर्ण टिप्पणी केली.

भास्कर इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या कंपनीला स्टेट बँक ऑफ इंडियाने परतफेडीच्या क्षमतेचे योग्य मूल्यांकन न करता ८ कोटी ९ लाख रुपयांचे कर्ज दिले होते. विशेष म्हणजे, कंपनी कर्जाचा पहिला हप्तादेखील भरू शकली नाही आणि सहा वर्षे थकबाकीदार राहिली. त्यानंतर बँकेने कंपनीच्या मालमत्ता ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली. या प्रकरणात बँकेच्या हलगर्जीपणावर बोट ठेवत न्यायालयाने बँकांच्या दुटप्पी धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

न्यायालयाने म्हटले की, ‘‘या प्रकरणात, याचिकाकर्त्या कंपनीला ८.०९ कोटी रुपयांचे मोठे कर्ज मंजूर करताना एसबीआय आणि तिच्या अधिकाऱ्यांकडून निष्काळजीपणा झाल्याचे स्पष्ट दिसते. कारण याचिकाकर्ते कर्जाची परतफेड सुरूच करू शकले नाहीत आणि पहिल्याच हप्त्यात डिफॉल्टर ठरले. हे स्पष्टपणे दर्शवते की, संबंधित अधिकाऱ्यांनी कर्जदाराच्या परतफेड क्षमतेचे योग्य मूल्यांकन केले नव्हते.‘‘ न्यायालयाने *(पान २ वर)*

## तीन महिन्यांचा पगार थकला; जालना महापालिकेच्या घंटागाडी चालकांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर एल्गार

### ‘पगार द्या, नाहीतर कचरा उचलणार नाही’; अधिकाऱ्यांकडून दबाव व धमक्यांचा आरोप

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहराला दररोज स्वच्छ ठेवण्यासाठी पहाटेपासून रस्त्यावर उतरून कचरा संकलनाचे काम करणाऱ्या घंटागाडी चालकांचा संयम अखेर संपला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने संतप्त झालेल्या चालकांनी बुधवारी सकाळी मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर ठिय्या आंदोलन सुरू करत महापालिका प्रशासनाविरोधात जोरदार एल्गार पुकारला.



‘‘थकीत वेतन तात्काळ जमा करा, अन्यथा घंटागाड्या रस्त्यावर उतरवणार नाही,‘‘ असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिल्याने शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**वारंवार पाठपुरावा, तरीही पगाराचा पत्ता नाही**

आंदोलनकर्त्या चालकांनी सांगितले की, मागील तीन महिन्यांपासून वेतन थकले असून त्यासाठी अनेकदा महापालिका प्रशासनाकडे निवेदने देण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रश्न मांडण्यात आला. प्रत्येकवेळी आश्वासने मिळाली; मात्र प्रत्यक्षात खात्यात एक रुपयाही जमा झाला नाही.

‘‘आम्ही संयमाने वाट पाहिली. प्रशासनाला वेळ दिला. मात्र आता कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे आंदोलनाशिवाय आमच्यासमोर दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही,‘‘ असे चालकांनी स्पष्ट केले.

**‘‘घर चालवायचे कसे?‘‘ चालकांचा संतप्त सवाल**

आंदोलनादरम्यान अनेक चालकांनी आपल्या आर्थिक विवंचना मांडल्या. तीन महिने पगार न झाल्यामुळे घरखर्च कोलमडला असल्याचे त्यांनी सांगितले.

‘‘किराणा दुकानदार उधारी देत नाहीत. बँकेचे हप्ते थकले आहेत. वीजबिले भरता येत नाहीत. मुलांच्या शाळा सुरू झाल्या आहेत. प्रवेश फी, वह्या, पुस्तके, गणवेश यासाठी पैसे कुठून आणायचे?‘‘ असा सवाल त्यांनी प्रशासनाला केला.

काही चालकांनी तर कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी खासगी सावकारांकडून कर्ज घेण्याची *(पान २ वर)*

## ट्रॅक्टर ट्रॉली चोरी प्रकरणाचा अवघ्या काही तासांत छडा; पाच आरोपी जेरबंद

### हसनाबाद-वडोद बाजार पोलिसांची संयुक्त धडक कारवाई; १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**भोकरदन/जालना । प्रतिनिधी**

तळेगाव येथून चोरीस गेलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली प्रकरणाचा अवघ्या काही तासांत छडा लावत हसनाबाद आणि वडोद बाजार पोलिसांनी संयुक्त कारवाईत पाच आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीस गेलेली ट्रॅक्टर ट्रॉली, ट्रॅक्टरचे हेड तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्कॉर्पिओ कार असा तब्बल १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे ग्रामीण भागात वाढत असलेल्या वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यास मदत होणार असून पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**तळेगावातून ट्रॉलीची चोरी**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव (ता. फुलंब्री, जि. छत्रपती



संभाजीनगर) येथील शेतकरी लिंबाजी उत्तमराव गव्हाड यांनी आपली ट्रॅक्टर ट्रॉली घराजवळ उभी केली होती. दिनांक १० जून २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास त्यांनी पाहिले असता ट्रॉली जागेवर नव्हती. गव्हाड यांनी परिसरात शोध घेतला, मात्र ट्रॉलीचा कोणताही मागमूस लागला नाही. त्यानंतर त्यांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध हसनाबाद पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गुन्हा नोंदवून पोलिसांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली.

**माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला**

गुन्हा दाखल होताच हसनाबाद पोलिसांनी विशेष पथक तयार करून चोरीस गेलेल्या मालाचा शोध सुरू केला. तपासादरम्यान संबंधित ट्रॉली वडोद बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीकडे नेण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार हसनाबाद पोलिसांनी वडोद बाजार पोलिसांशी समन्वय साधत संयुक्त सापळा रचला. दोन्ही पथकांनी केलेल्या शोध मोहिमेदरम्यान आरोपी चोरीची ट्रॉली घेऊन जात असताना पोलिसांच्या जाळ्यात अडकले.

**पाच आरोपी ताब्यात**

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत
अमोल शिवाजी जाधव (वय २३), रा. इब्राहिमपूर, ता. भोकरदन
प्रभू पंडित जाधव (वय २५), रा. इब्राहिमपूर, ता. भोकरदन
अजय मदन गिरी (वय २५), रा. मासनापूर, ता. भोकरदन
वैभव हरिदास जाधव (वय २१), ा. कुंभारी, ता. भोकरदन
भरत रामदास सिंगारे (वय २१), रा. कडवंची, ता. जालना
प्राथमिक चौकशीत आरोपींकडून चोरीची कबुली मिळाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

**१४ लाखांचा मुद्देमाल जप्त**

आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी पुढील मुद्देमाल जप्त केला आहे
फिकट काळसर रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली (क्र. -२१--१७४८)
लाल रंगाचे स्वराज ७४२ कंपनीचे ट्रॅक्टर हेड
गुन्ह्यात वापरण्यात आलेली पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ कार (क्र. -०५--२०५६) जप्त करण्यात आलेल्या या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १४ लाख रुपये *(पान २ वर)*

## भोईपुऱ्यातील ‘त्या’ नाल्यांची सफाई करून अतिक्रमण तात्काळ हटवा

### मनपा आयुक्त अंजली शर्मा यांचे आदेश



**जालना -प्रतिनीधी**

जुना जालना भागातील मोठया नाल्यांची सफाई करून सदर नाल्यांवरील अतिक्रमण तात्काळ निष्कासित करण्याचे आदेश जालना मनपाच्या आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांनी स्वच्छ्ता विभाग प्रमुखांना दिले आहेत.

जालना शहरात दोन दिवसांपूर्वी झालेल्या पहिल्या जोरदार पाऊसामुळे जालना महानगर पालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या मानसूनपूर्व स्वच्छ्ता मोहिमेचा पूर्णतः फज्जा उडाल्याचे चित्र शहरातील अनेक भागात दिसून आले. प्रभाग क्रमांक १४ चे नगरसेवक तथा स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर यांनी भोईपुरा आणि सरस्वती भुवन प्रशाला *(पान २ वर)*

## कदीम जालना पोलिसांची धडाकेबाज कारवाई; जबरी चोरी करून फरार झालेला आरोपी जेरबंद

### मारहाण करून खिशातील रोकड लुटली; फावड्याने डोक्यात वार केल्याचा आरोप

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील नूतन वसाहत परिसरात एका व्यक्तीस अडवून शिवीगाळ, मारहाण आणि जबरी चोरी केल्याप्रकरणी फरार असलेल्या आरोपीला कदीम जालना पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. आरोपीकडून गुन्ह्यातील १ हजार ६३० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ४ जून २०२६ रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास नूतन वसाहत परिसरातील




गजानन किराणा दुकानाजवळ ही घटना घडली होती. तक्रारदार सुभाष काळुंके हे आपल्या कामानिमित्त परिसरातून जात असताना आरोपी ऋषीकेश दीपक कांबळे याने त्यांना अडवले.

**शिवीगाळ, मारहाण आणि जबरी चोरी**

प्राथमिक माहितीनुसार, आरोपीने तक्रारदारास अडवून त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर तक्रारदाराच्या खिशातील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. विरोध केल्याने आरोपीने तक्रारदाराला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. घटनेदरम्यान आरोपीने फावड्याने तक्रारदाराच्या डोक्यावर वार करून दुखापत केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या हल्ल्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**गुन्ह्यानंतर आरोपी फरार**

घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता. जखमी अवस्थेत असलेल्या तक्रारदाराने कदीम जालना पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीचा शोध सुरू केला.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी विविध ठिकाणी शोधमोहीम राबवली. स्थानिक माहितीदारांचे जाळे सक्रिय करण्यात *(पान २ वर)*

## किडनी स्टोनच्या शस्त्रक्रियेमुळे स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल १५ दिवस विश्रांतीवर

### नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेचे स्वच्छता व आरोग्य सभापती कपिल श्रावण भुरेवाल यांच्यावर अल्पावधीत दुसऱ्यांदा किडनी स्टोनची शस्त्रक्रिया करण्यात आली असून डॉक्टरांनी त्यांना किमान १५ दिवस पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे या कालावधीत नियमित शासकीय कामकाज आणि नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष पाहणे त्यांना शक्य होणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भुरेवाल यांच्या उजव्या बाजूच्या ( ) किडनीमध्ये स्टोन



असल्याने त्यांच्यावर दिनांक २ जून २०२६ रोजी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही आरोग्याच्या काही तक्रारी कायम राहिल्याने त्यांनी पुढील वैद्यकीय तपासणी केली. या तपासणीत डाव्या बाजूच्या ( ) किडनीमध्येही स्टोन असल्याचे निदर्शनास आले.

यानंतर दिनांक १० जून २०२६ रोजी पुणे येथील सय्याद्री हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर दुसरी शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असून पुढील १५ दिवस अत्यावश्यक वैद्यकीय देखरेखीखाली राहण्याचे निर्देश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर कपिल भुरेवाल यांनी महापौर, उपमहापौर, आयुक्त, उपायुक्त, सर्व विभाग प्रमुख तसेच स्वच्छता निरीक्षकांना विनंती केली आहे की, त्यांच्या अनुपस्थितीत महानगरपालिकेचे कामकाज आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करावे.

भुरेवाल यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, स्वच्छता व आरोग्य विभागाशी संबंधित *(पान २ वर)*

# संपादकीय...

## कविता केवळ शब्द नसते, ती समाजाला जगण्याची उमेद देणारी शक्ती असते

जालना येथे मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या वतीने आयोजित कवी संमेलनात सादर झालेल्या कविता आणि गझलांनी एक महत्त्वाचा संदेश दिलासाहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाच्या जखमांवर फुंकर घालणारे, संघर्षाला दिशा देणारे आणि निराशेला आशावादात बदलणारे सामर्थ्यवान माध्यम आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावग्रस्त जीवनात माणूस तंत्रज्ञानाच्या जवळ जात असताना संवेदनांपासून दूर जात असल्याची खंत व्यक्त केली जाते. अशा काळात कवी कृष्णा कदम यांच्या ''खरा शेतकरी असशील तर फास गळ्याला लावू नको...'' या ओळी केवळ कविता राहत नाहीत, तर त्या हजारो संकटग्रस्त शेतकऱ्यांना जगण्याचा संदेश देणारी सामाजिक हाक ठरतात. महाराष्ट्राने गेल्या दोन दशकांत शेतकरी आत्महत्यांचे भीषण वास्तव अनुभवले आहे. अशा परिस्थितीत आशेचा किरण दाखवणारे साहित्य समाजासाठी अत्यंत आवश्यक ठरते.

साहित्याचा समाजाशी असलेला जिवंत संबंध

या कवी संमेलनातील बहुतांश कविता या केवळ कल्पनारम्य नव्हत्या. त्या समाजाच्या वास्तवाशी जोडलेल्या होत्या. शेतकरी, कर्जबाजारीपणा, उपासमार, पर्यावरण, हिंसाचार, प्रेम, निसर्ग आणि मानवी संघर्ष या विषयांवर कवींनी भाष्य केले. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, खरे साहित्य हे काळाच्या प्रश्नांपासून पळ काढत नाही; उलट ते त्या प्रश्नांना शब्द देते.

कवी गणेश खरात यांच्या कवितेतून भाकरीसाठी धावणाऱ्या सामान्य माणसाचे वास्तव समोर येते. प्रा. एकनाथ शिंदे यांनी ''कर्जमाफी''मधून शेतकऱ्यांच्या तुटलेल्या स्वप्नांचे चित्र उभे केले. कैलास भाले यांनी पर्यावरण विनाशाचा इशारा दिला. या सर्व कविता समाजाच्या वेगवेगळ्या वेदनांना अभिव्यक्त करणाऱ्या ठरल्या.

आज माध्यमांमध्ये आणि सार्वजनिक चर्चांमध्ये राजकारण, आरोप-प्रत्यारोप आणि सनसनाटी विषयांना प्राधान्य मिळत असताना साहित्य मात्र माणसाच्या अंतर्मनाशी संवाद साधत राहते. म्हणूनच अशा कवी संमेलनांचे महत्त्व अधिक वाढते.

संवेदनशील समाजासाठी साहित्याची गरज

आज समाजासमोर आर्थिक विषमता, बेरोजगारी, मानसिक तणाव, पर्यावरणीय संकट आणि सामाजिक ध्रुवीकरण यांसारखी अनेक आव्हाने आहेत. या प्रश्नांची उत्तरे केवळ शासनाच्या योजनांमध्ये किंवा कायद्यांमध्ये सापडणार नाहीत. त्यासाठी समाजाची संवेदनशीलता जिवंत राहणे आवश्यक आहे.

कविता माणसाला विचार करायला भाग पाडते. ती रडवते, हसवते, अस्वस्थ करते आणि अनेकदा जगण्याची नवी प्रेरणाही देते. म्हणूनच साहित्यिक कार्यक्रम हे समाजाच्या सांस्कृतिक आरोग्याचे निदर्शक असतात.

डिजिटल युगात साहित्याचे वाढते महत्त्व

मोबाईल, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या युगात साहित्याचे महत्त्व कमी झाले आहे, असा समज अनेकदा व्यक्त केला जातो. मात्र वास्तव याउलट आहे. माहितीचा स्फोट होत असताना विचारांची खोली कमी होत चालली आहे. अशा वेळी कविता माणसाला थांबून स्वतःकडे पाहायला शिकवते.

मृगाच्या स्वागतानिमित्त आयोजित या काव्यमैफलीत निसर्ग, पाऊस आणि मानवी भावना यांचा सुंदर संगम दिसून आला. हेच साहित्याचे वैशिष्ट्य आहेते एका क्षणाला शाश्वत बनवते. जालना येथील हे कवी संमेलन केवळ साहित्यिक कार्यक्रम नव्हता; तो समाजाच्या जिवंत संवेदनांचा उत्सव होता. शेतकऱ्यांच्या वेदना, सामान्य माणसाचा संघर्ष, पर्यावरणाची चिंता आणि आशेचा संदेश या सर्वांचा समन्वय या मंचावर पाहायला मिळाला. आज समाजाला केवळ विकासाच्या आकड्यांची नाही, तर जगण्याची उमेद देणाऱ्या विचारांची गरज आहे. कविता ती उमेद देते. म्हणूनच अशा साहित्यिक उपक्रमांना केवळ सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून न पाहता समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. शब्द जेव्हा माणसाच्या वेदनांना स्पर्श करतात, तेव्हाच साहित्य खऱ्या अर्थाने समाजाचे प्रतिबिंब आणि भविष्याचा मार्गदर्शक ठरते.

## मौजे गेवराईमंठा शिव रस्त्यावरील अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करण्याची शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे मागणी

**मंठा - प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे गेवराईमंठा शिव रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून संबंधित अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ता मोकळा करून द्यावा, अशी मागणी गेवराई शिवारातील शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की मौजे गेवराईमंठा शिव हा रस्ता अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी वापरला जात आहे. मात्र शेतकरी गजानन नारायण बोराडे यांनी या शिवरस्त्यावर अतिक्रमण करून रस्त्याचा काही भाग ताब्यात घेतल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यास तसेच मशागतीची कामे, कृषी अवजारांची ने-आण व शेतीमालाची वाहतूक करताना अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, संबंधित व्यक्तीस अनेक वेळा समजावून सांगूनही अतिक्रमण हटविण्यात आले नाही. उलट रस्त्याचे काम करू नये, अन्यथा परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिल्याचाही आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या अतिक्रमणामुळे काही शेतकऱ्यांच्या शेतात जाणारा मार्गही बंद झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.तहसीलदारांनी घटनास्थळी पंचनामा करून प्रत्यक्ष पाहणी करावी तसेच मौजे गेवराईमंठा शिव रस्त्यावरील अतिक्रमण हटवून मूळ रस्ता मोकळा करून द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

या निवेदनावर डॉ. आबासाहेब बोराडे, डॉ. प्रकाश बोराडे, रामदास झोल, बाबुराव शहाणे, कृष्णा भावसार, अंबादास बोराडे, नारायण बोराडे, विजय बोराडे, श्याम हजारे, लक्ष्मीकांत हजारे, इंद्रजीत हातकळके, भरत फुटाणे, विष्णू लाटे, रामजी बोराडे, शिवाजी तिवारी, संतोष बोराडे, सुनील बोराडे, रमेश चव्हाण, तुकाराम राठोड यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पान १ व ४ वरुन....

### 'मेडिसिटी'द्वारे...

जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे २५० एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे.

प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे १.२ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि १०,००० हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत.

मेडिसिटीभोवती विकसित होणाऱ्या व्यापक नवोन्मेष परिसंस्थेचा भाग म्हणून, लक्ष्मी एन. मित्तल यांनी स्थापन केलेल्या एलएनएमआयआयटी, जयपूरने क्लीव्हलँड क्लिनिक आणि एनएमआयएमसीसोबत संशोधन पायाभूत सुविधा, प्रगत तंत्रज्ञान क्षमता आणि शैक्षणिक कौशल्य उपलब्ध करून अत्याधुनिक आरोग्य सेवा नवोन्मेष, ट्रान्सलेशनल रिसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रिसिजन मेडिसिन उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे.

क्लीव्हलँड क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ. टॉम मिहाल्जेविक म्हणाले, ''क्लीव्हलँड क्लिनिक जगभरातील धोरणात्मक भागीदारीद्वारे रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी कटिबद्ध आहे. एनएमआयएमसी हा भविष्यातील रुग्ण, आरोग्य व्यावसायिक आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दूरदर्शी आरोग्य परिसंस्थेत आमचे कौशल्य योगदान देण्याची संधी आहे. महाराष्ट्र शासन, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भारतात क्लिनिकल उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शिक्षणासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उभारण्यासाठी सहकार्य करताना आम्हाला आनंद होत आहे.''

ब्रुकफिल्डचे व्यवस्थापकीय भागीदार आणि आशिया पॅसिफिक विभागाचे रिअल इस्टेट प्रमुख अंकुर गुप्ता म्हणाले, ''नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडवून आणणारी पायाभूत सुविधा उभारण्याची एक अद्वितीय संधी आहे. महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भविष्यातील अनेक पिढ्यांना लाभदायी ठरणारे जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा केंद्र उभारण्याचा आम्हाला अभिमान आहे.''

आरोधन हेल्थ सिटीच्या संस्थापक आणि संचालक डॉ. सलोनी पटवर्धन म्हणाल्या, ''जगातील सर्वोत्तम संस्थांना एकत्र आणून एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्था निर्माण करणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. आजचा हा टप्पा आम्हाला त्या ध्येयाच्या आणखी जवळ घेऊन गेला असून नवी मुंबईमध्ये जागतिक आरोग्य सेवा केंद्र स्थापन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे.''

महाराष्ट्र शासन या भागीदारीसाठी आवश्यक सहकार्य करेल तसेच लागू असलेल्या धोरणे आणि नियमांनुसार आवश्यक मंजुरी आणि परवानग्या मिळविण्यासाठी या समूहाला मदत करेल.

**नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विषयी**

नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी हा महाराष्ट्र शासन विकसित करत असलेला एक परिवर्तनकारी आरोग्य आणि जीवन विज्ञान उपक्रम आहे. भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक म्हणून विकसित होणारा हा प्रकल्प नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत उभारला जाणार आहे. जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा प्रदाते, संशोधक, शिक्षक, नवोन्मेषक आणि गुंतवणूकदार यांना एकत्र आणून क्लिनिकल उत्कृष्टता, संशोधन, नवोन्मेष आणि वैद्यकीय शिक्षणावर आधारित जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक आरोग्य सेवा केंद्र निर्माण करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

### मोठ्या कंपन्यांना...

कंपनीची याचिका फेटाळली, परंतु बँकेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशन, जालनाचे अध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले, ''सर्वोच्च न्यायालयाची ही टिप्पणी बँकिंग क्षेत्रातील कटू वास्तवावर अचूक बोट ठेवणारी आहे. हा निकाल म्हणजे सामान्य कर्जदारांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे. आम्ही आमच्या दैनंदिन कामकाजात पाहतो की, सामान्य नागरिक, शेतकरी किंवा छोटे व्यावसायिक जेव्हा गृहकर्ज, वाहन कर्ज किंवा वैयक्तिक कर्जासाठी बँकेत जातात, तेव्हा त्यांना अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून आणि किचकट प्रक्रियेत अडकवून मानसिक त्रास दिला जातो. याउलट, मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांना मात्र कोणत्याही ठोस तपासणीशिवाय कोट्यवधींचे कर्ज सहज उपलब्ध होते.''

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''न्यायालयाने वापरलेला छळाच्या सीमेपर्यंत हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. तो बँकांच्या मनमानी कारभाराला चपराक आहे. कर्ज थकल्यावर सामान्य माणसाची मालमत्ता जप्त करण्यासाठी बँका अत्यंत तत्परता दाखवतात, पण मोठ्या थकबाकीदारांवर कारवाई करताना मात्र त्या हलगर्जीपणा करतात. सर्वोच्च न्यायालयाच्या या निरीक्षणाने आता रिझर्व्ह बँकेने आणि केंद्र सरकारने बँकांच्या कर्ज धोरणात समानता आणि पारदर्शकता आणण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.''

सर्वोच्च न्यायालयाने हेदेखील स्पष्ट केले की, त्यांचा उद्देश कर्ज देण्याचे नियम शिथिल करण्याचा नाही, तर सामान्य लोकांसाठी कर्ज घेण्याची आणि परतफेडीची प्रक्रिया अधिक सोपी, पारदर्शक आणि न्याय्य असावी, हा आहे. न्यायालयाने म्हटले की, ''कर्जावरील सवलती आणि प्रोत्साहनांबाबतचे धोरण अशा प्रकारे तयार केले पाहिजे की, त्याचा जास्तीत जास्त फायदा सामाजिक आणि आर्थिक स्तरावर सर्वात खालच्या घटकाला मिळेल.

### तीन महिन्यांचा...

वेळ आल्याचे सांगितले. शहराची स्वच्छता राखणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**पहाटेपासून दुपारपर्यंत काम; तरीही न्याय नाही**

घंटागाडी चालकांचे म्हणणे आहे की, ते दररोज सकाळी पाच वाजल्यापासून शहरातील विविध भागांत जाऊन कचरा संकलनाचे काम करतात. उन्हाळा असो, पावसाळा असो किंवा हिवाळा, कोणत्याही परिस्थितीत शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी ते पार पाडतात. मात्र एवढे कष्ट करूनही वेळेवर वेतन मिळत नसल्याने त्यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

**धोकादायक घंटागाड्यांमधून जीव धोक्यात घालून काम**

वेतनाचा प्रश्न मांडतानाच चालकांनी वाहनांच्या दुरवस्थेचाही मुद्दा उपस्थित केला. अनेक घंटागाड्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून त्यांची वेळेवर दुरुस्ती केली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला.

चालकांच्या म्हणण्यानुसार अनेक वाहनांचे टायर पूर्णपणे झिजलेले आहेत. काही वाहनांचे ब्रेक व्यवस्थित काम करत नाहीत. इंजिन आणि इतर यांत्रिक भागांमध्ये वारंवार बिघाड होत असतो. अशा वाहनांमधून शहरभर फिरताना अपघाताचा धोका कायम डोक्यावर असतो.

''आम्ही अक्षरशः जीव मुठीत धरून वाहन चालवतो. उद्या एखादा गंभीर अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**अधिकाऱ्यांकडून धमक्या दिल्या जात असल्याचा गंभीर आरोप**

आंदोलनकर्त्यांनी काही अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करताना सांगितले की, आंदोलन मागे घेण्यासाठी दबाव टाकला जात आहे.

''कामावर हजर व्हा, अन्यथा परिणाम भोगावे लागतील'', अशा प्रकारचे फोन आणि संदेश मिळत असल्याचा दावा काही चालकांनी केला. आंदोलनाचा घटनात्मक अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

या आरोपांमुळे महापालिका प्रशासन आणि कर्मचाऱ्यांमधील तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**''हा हक्काचा लढा; राजकारणाशी संबंध नाही''**

या आंदोलनामागे कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा संघटनेचा हात नसल्याचे चालकांनी स्पष्ट केले. हे आंदोलन केवळ थकीत वेतन आणि मूलभूत कामगार हक्कांसाठी असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर शहरातील अनेक लोकप्रतिनिधी आणि संबंधित पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याची नाराजीही आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

**जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेण्याचा इशारा**

महापालिका प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही तर पुढील टप्प्यात सर्व चालक जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन न्याय मागणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी जाहीर केले.

तसेच आवश्यकता भासल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल आणि कामबंद आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल, असा इशाराही देण्यात आला.

**शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची भीती**

घंटागाडी चालकांनी काम बंद केल्यास शहरातील कचरा संकलन व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक भागांत कचऱ्याचे ढिगारे साचण्याचा धोका निर्माण झाला आहे.

पावसाळ्याच्या तोंडावर स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम झाल्यास आरोग्याच्या समस्याही वाढू शकतात. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून हा प्रश्न सोडविण्याची मागणी नागरिकांमधूनही होत आहे.

**आंदोलनात मोठ्या संख्येने चालकांची उपस्थिती**

या आंदोलनात नितीन दाभाडे, अक्षय भूरेवाल, विजय भूरेवाल, अनिकेत खंडागळे, बाबू शेख, अनिल लांडगे, स्वप्नील साळवे, वाडेकर, अजय जगदाने, आकाश ढिल्पे, आकाश साबळे, पिंटू, तौफीक शेख, किरण जगधने, तुकाराम पवार, गज्जू मानपाडा, अश्विन पगार, कैलास खानदारी, बबलू जगदने, दीपक रगडे, सचिन मोरेकर, दीपक कांबळे, गणेश लोखंडे, रवी सारथी, संदीप राजगीरी, विलास वायर, विशाल कांबळे, रुद्र कारटून, संतोष चांदणी, गणेश गायकवाड, सूरज बनसोडे, लाखे यांच्यासह अनेक चालक सहभागी झाले होते.

**प्रश्न फक्त पगाराचा नाही**

घंटागाडी चालकांचे आंदोलन हे केवळ तीन महिन्यांच्या थकीत वेतनापुरते मर्यादित नसून, वाहनांची दुरवस्था, सुरक्षिततेचा अभाव, कामगारांवरील कथित दबाव आणि प्रशासनाची उदासीनता याविरोधातील असंतोषाचेही प्रतीक मानले जात आहे. आता महापालिका प्रशासन या आंदोलनावर काय भूमिका घेते आणि चालकांच्या मागण्यांबाबत कोणता निर्णय घेते, याकडे संपूर्ण जालना शहराचे लक्ष लागले आहे.

### ट्रॅक्टर ट्रॉली चोरी...

असल्याचे पोलिसांनी सांगितले. तपास सुरू अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून या टोळीचा इतर वाहन चोरीच्या गुन्ह्यांशी संबंध आहे का, याचाही तपास सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ. देवकर करीत आहेत.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेजबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे, पोलीस उपनिरीक्षक सखाहरी तायडे, सपोनि जोनवाल, पोउपनि क्षीरसागर, पोहेकॉ दुर्गेश राठोड, पोलीस कॉन्स्टेबल दीपक सोनुने, निलेश खराट, प्रकाश बोर्ड, नारायण चरावंडे, गाडेकर, पवार, पाटीलपाईक तसेच वडोद बाजार पोलीस ठाण्यातील गायकवाड, तेलगोटे, दरगुंडे आणि बिडकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक**

तक्रार प्राप्त होताच काही तासांत आरोपींचा शोध घेऊन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून हसनाबाद व वडोद बाजार पोलिसांच्या संयुक्त कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### भोईपुऱ्यातील...

परिसरातील प्रथम पाहणी करून तेथील नागरिकांच्या अडी अडचणी जाणून घेत सदर अडचणी आणि समस्या मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्याकडे मांडल्या होत्या. या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त अंजली शर्मा यांनी आज बुधवार दि.१० जून रोजी जुना जालना भागातील प्रभाग क्रमांक १४ मधील भोईपुरा, सरस्वती भुवन प्रश्नाला या परिसरातून वाहणाऱ्या मोठया नाल्याची पाहणी करून सदर नाल्यावर झालेले अतिक्रमण तसेच नाल्यांमध्ये मोठया प्रमाणावर साचलेला गाळ याची तात्काळ दाखल घेत संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी करत नाल्यावर झालेले अतिक्रमण तात्काळ हटवून लवकरात लवकर स्वच्छता करण्याचे आदेश संबंधित अधिकारी स्वच्छता विभाग प्रमुखांना दिले. याप्रसंगी स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, नगरसेवक शशिकांत घुगे, सिद्धीविनायक मुळे, सुनील एखंडे,शहर अभियंता सय्यद सउद, स्वच्छता विभाग प्रमुख सुधीर डहाळे, स्वच्छता निरीक्षक मंगेश साठे, अरुण वानखेडे, शोएब पठाण, श्रावण सराटे व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

### कदीम जालना...

आले आणि आरोपीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले.

**पोलिसांच्या शिताफीने आरोपी ताब्यात**

सततच्या शोध मोहिमेनंतर कदीम जालना पोलिसांना आरोपीच्या ठिकाणाबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपी ऋषीकेश दीपक कांबळे (वय २५, रा. नूतन वसाहत, जुना जालना) यास ताब्यात घेतले.

चौकशीनंतर त्याला अटक करण्यात आली असून गुन्ह्यातील चोरीस गेलेली १ हजार ६३० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

**भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा**

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९४/२०२६ नोंद करण्यात आला असून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(६), १२६(२), ११५(२), ३५२ आणि ३(५) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेजबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, पोहेकॉ सदा राठोड, पोहेकॉ सचिन चौधरी, पोहेकॉ गजानन पुरी, पोलीस कॉन्स्टेबल मतीन शेख, इम्रान खान, प्रशांत गायकवाड आणि संदीप चव्हाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**पुढील तपास सुरू**

या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ गजानन पुरी करीत असून आरोपीचा यापूर्वी अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये सहभाग होता का, तसेच इतर कोणते गुन्हे त्याच्याविरुद्ध दाखल आहेत का, याचाही तपास पोलीस करीत आहेत.

**चार दिवसांत आरोपी गजाआड**

नूतन वसाहत परिसरात घडलेल्या जबरी चोरी आणि मारहाणीच्या घटनेनंतर अवघ्या चार दिवसांत आरोपीला अटक करण्यात कदीम जालना पोलिसांना यश आले. फरार आरोपीचा शोध घेऊन चोरीची रक्कम हस्तगत केल्यामुळे पोलिसांच्या तत्परतेचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

### किडनी स्टोनच्या...

अनेक कामे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीचा कोणताही विपरीत परिणाम जनतेवर होऊ नये, यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्था, आरोग्यविषयक उपक्रम आणि नागरिकांच्या तक्रारींचे निवारण नियमितपणे सुरू ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

स्वच्छता व आरोग्य विभागाच्या माध्यमातून शहरातील स्वच्छता व्यवस्थापन, कचरा संकलन, सार्वजनिक आरोग्याशी संबंधित विविध उपक्रम आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी भुरेवाल सक्रियपणे काम करत आहेत. त्यांच्या अचानक झालेल्या आरोग्य समस्येमुळे काही काळासाठी त्यांना सार्वजनिक जीवनापासून दूर राहावे लागणार असले तरी लवकरात लवकर पूर्णपणे बरे होऊन पुन्हा सेवेत रुजू होण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

शेवटी त्यांनी महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

**''नागरिकांची कामे थांबू नयेत''**

''माझ्या प्रकृतीमुळे काही दिवस नियमित कामकाज पाहणे शक्य होणार नाही. मात्र शहरातील स्वच्छता व आरोग्यविषयक कामे सुरळीत सुरू राहावीत, नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवाव्यात आणि प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य करावे,'' असे आवाहन स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल यांनी केले आहे.

### सरसकट कर्जमाफीसाठी...

**प्रशासनाला जबाबदार धरण्याचा इशारा**

निवेदनात आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यासाठी प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे आगामी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनासमोर कायदा व सुव्यवस्थेचे आव्हान निर्माण होण्याची शक्यता आहे.

**विविध अधिकाऱ्यांना प्रतिलिपी**

या निवेदनाच्या प्रतिलिपी जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा निबंधक, तालुका पोलीस स्टेशन जालना तसेच जालना, अंबड, घनसावंगी, बदनापूर, परतूर, मंठा, भोकरदन आणि जाफराबाद येथील पोलीस निरीक्षकांना देण्यात आल्या आहेत.

**शेतकरी नेत्यांची पुढाकार**

या निवेदनावर गजानन रामनाथ उगले (रा. राजेगाव, ता. घनसावंगी), विजय भवरकडूबा पठाडे, निवृत्ती खरात, गणेश चांदगुडे यांच्यासह जालना जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**राजकीय व सामाजिक वर्तुळाचे लक्ष**

२२ जून रोजी प्रस्तावित आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष आता राज्य सरकारच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. शासन शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेते की आंदोलन अधिक तीव्र होते, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

### जिल्ह्यात निर्यातवाढीसाठी...

माहिती देण्यात आली. गुणवत्तानियंत्रण व प्रमाणनासाठी प्रयोगशाळा स्थापन करणे, निर्यात प्रोत्साहन परिषद (ईपीसी) व प्रादेशिक डीजीएफटी कार्यालयाशी सक्रिय समन्वय ठेवणे, मासिक डीईपीसी बैठका नियमित घेणे, जिल्हा विशिष्ट उत्पादनांसाठी गुणवत्ता व सुरक्षा मानके निश्चित करणे तसेच मूल्यवर्धन आणि तंत्रज्ञानाच्या वापरासाठी उद्योजकांची क्षमता विकसित करणे या बाबींवरही सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीत 'एक जिल्हा एक उत्पादन' () उपक्रमांतर्गत सात कलमी कृती आराखड्याचाही आढावा घेण्यात आला. यामध्ये 'एक जिल्हा एक उत्पादन' सुविधा केंद्राची स्थापना, सत्यापित विक्रेते व निर्यातदारांची यादी तयार करणे, जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांची निवड व शिफारस करणे, जिल्हा निर्यात योजनेची तयारी व अंमलबजावणीचे निरीक्षण, 'भगिनी जिल्हा' संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी, उद्योजकांचे प्रशिक्षण तसेच सर्व क्षेत्रातील घटकांचा सक्रिय सहभाग वाढविणे यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. जिल्ह्यातील निर्यातवाढीसाठी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, औद्योगिक संघटना व संबंधित विभागांनी सातत्याने समन्वय ठेवून कार्य करावे आणि निर्यातवृद्धीसाठी प्रभावी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले. त्यांनी निर्यातक्षम उद्योगांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही स्पष्ट केले.

### पत्रकारांचे हक्काचे...

स्तंभ मानले जातात. शासनाच्या योजना सुविधा उपलब्ध आहेत. त्याच धर्तीवर जनतेपर्यंत पोहोचविणे, नागरिकांच्या जाफ्राबाद येथेही पत्रकार भवनासाठी जागा समस्या प्रशासनापर्यंत मांडणे आणि उपलब्ध करून आवश्यक निधी मंजूर समाजातील विविध प्रश्नांना वाचा करावा, अशी मागणी करण्यात येत आहे. फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार पत्रकार भवन उभारल्यास पत्रकारांना सातत्याने करत असतात. मात्र, जाफ्राबाद संघटितपणे काम करण्यासाठी सक्षम तालुक्यात स्वतंत्र पत्रकार भवन नसल्याने व्यासपीठ मिळेल आणि पत्रकारिता क्षेत्राच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करताना विकासालाही चालना मिळेल, असा विश्वास अडचणी निर्माण होत असल्याचे सांगितले व्यक्त केला जात आहे. जात आहे. पत्रकारांना एकत्रित व्यासपीठ

### पुनर्वसीत जाफराबाद...

थांबतील यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. बसथांब्याचे अस्तित्व केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात प्रवाशांच्या उपयोगी पडावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# माहोराचे सरपंचाकडून सरकारी जागेवर अतिक्रमण

## गटविकास अधिकाऱ्यांचा अहवाल असताना जिल्हा प्रशासनाकडून अपात्रतेची कारवाई करण्यास टाळाटाळ

**मंठा - योगेश राठोड**

मंठा- तालुक्यातील माहोरा गावचे सरपंच सुभाष दासू चव्हाण यांच्या विरोधात तुकाराम धनु राठोड यांनी एल्गार पुकारला असून, सरपंचाने गावातील सरकारी जागेवर सिमेंट काँक्रीटचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याचा मंठा तालुका प्रशासनाचा अहवाल असताना जिल्हाधिकाऱ्याकडून अद्याप संबंधित सरपंचावर अपात्रतेची कारवाई करण्यात आलेली नाही. तक्रारदारास तारीख पे तारीख देऊन जिल्हा प्रशासन २ वर्षापासून चालढकलपणा करीत असल्याचे दिसून येते.

देवाभाऊच्या राज्यात जिल्हाधिकारी न्याय देणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

यासंदर्भात तक्रारदार तुकाराम राठोड यांनी सरपंच सुभाष चव्हाण यांचेविरुद्ध सरकारी

तक्रारदार तुकाराम राठोड दोन वर्षापासून न्यायाच्या प्रतीक्षेत; देवाभाऊच्या राज्यात जिल्हाधिकारी न्याय देणार का?

जागेवर अतिक्रमण केल्याची तक्रार गटविकास अधिकारी पंचायत समिती मंठा यांच्याकडे सन २०२४ मध्ये केली होती. गटविकास अधिकारी यांच्या आदेशाने मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक यांनी पंचनामा करून सरपंचाने सरकारी जागेवर अतिक्रमण केल्याचा अहवाल गटविकास अधिकारी यांनी प्रशासनाकडे दिलेला असून, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम १४ (१), (ज-३) विवाद अर्ज तक्रारदार यांनी गैरअर्जदार सरपंच सुभाष चव्हाण यांच्याविरुद्ध जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात सादर केल्यानंतरही सरपंच श्री. चव्हाण यांना सरपंच पदावरुन

**अद्यापपर्यंत अपात्र करण्यात आलेले नाही.**

तक्रारदार तुकाराम राठोड यांनी एवढ्यावरच न थांबता सरपंच सुभाष चव्हाण यांच्या विरोधात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सुद्धा तक्रारी केल्या. मात्र, त्यांना अद्यापपर्यंत न्याय मिळालेला नाही. तसेच माहोरा गावात मागील अनेक वर्षापासून सरपंचाच्या मर्जीने चालणारे अवैध दारु विक्री, जुगार अड्डे बंद करावेत, अशी तक्रार तुकाराम राठोड यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग जालना यांच्याकडे वेळोवेळी केल्यानंतरही कारवाई केली जात नाही. याउलट तक्रार का केली? म्हणून गावातील पुतण्याच्या लग्नात सरपंच सुभाष चव्हाण यांच्यासह सुखदेव राठोड व दोन व्यक्तींनी तक्रारदारास व त्याच्या पत्नीस शिवीगाळ व मारहाण केली. सेवली पोलीस मात्र अर्थपूर्ण तडजोड करून थातूर-मातूर कारवाई करीत संबंधित अवैध दारू विक्री व जुगार अड्डे चालविणाऱ्यांना पाठीशी घालतात. सरपंचाच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल असताना सेवली पोलीस स्टेशनला सरपंचाची कायमस्वरूपी उठबैस असते.

सरपंच सुभाष चव्हाण यांच्यासह त्याच्या नातेवाईकांकडून आपल्या व कुटुंबीयांच्या जीवितास धोका असून, न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा तक्रारदार तुकाराम राठोड यांनी दिला आहे.

# जाफराबाद तालुक्यातील जवखेडा येथील, श्री राम चरित्र चिंतन कथेला भाविकांचा मोठा प्रतिसाद

## शिवभक्त परायण भाऊ पाटील यांचे रसाळ वाणीतून चिंतन कथा

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील जवखेडा ठेंग येथील प्रसिद्ध जनेश्वर महादेव मंदिर संस्थान, जनार्दन स्वामी गोसेवा आश्रम तर्फे आयोजित श्रीराम चरित्र चिंतन कथेस भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. पुरुषोत्तम मास म्हणजेच अधिक मास, अधिकमासाच्या पुण्य पर्व काळामध्ये श्री राम चरित्र कथेचे आयोजन वरील संस्थांमार्फत करण्यात आले. कथेचे निरूपण प्रसिद्ध कथाकार तथा निरूपणकार, सद्गुरू जनार्दन स्वामी महाराजांचे पट्ट शिष्य, शिवभक्त,हरिभक्त परायण भाऊ पाटील महाराज अभ्यासपूर्ण आणि चरित्र कथेचे चिंतन करीत आहे. प्रभू रामचंद्रांचा आदर्श जीवनवाद, त्यांचे धर्मावरची धर्मनिष्ठा, कर्तव्यातील कर्तव्यपरायणता, आणि समाज हित समजावून सांगत असताना आजच्या कलियुगातील घडामोडीतील सर्वच विषयांवर प्रकाश टाकताना भाऊ पाटील दिसत आहे. खते दरम्यान श्री राम जन्म




कथा, वनवास, भक्ती, त्याग, कर्तव्यनिष्ठा, रामराज्याची संकल्पना यावर सखोल विवेचन चालू आहे.. लोकांनी संस्काराची शिदोरी सोबत घेतानाच समाजसेवा, सदाचार जोपासावा यावरही ते भर देत आहे. या कथेच्या माध्यमातून युवकांबद्दलही चांगले संस्कार आणि त्यात प्रेरणा या गोष्टी कशा महत्त्वाच्या आहेत ते सुद्धा समजावून सांगत आहे. धर्मनिष्ठा समजून सांगत असताना समाजातील एकता कशी टिकून राहील यावरही ते भाष्य करीत आहे. या सोहळ्याला परमपूज्य माधवगिरी महाराज यांच्या आशीर्वाद असून या सोहळ्यासाठी टेंभुर्णी गोदनखेडा आश्रमाचे परमपूज्य महेश गिरी महाराज यांच्या विषयी उपस्थितीमध्ये, तसेच जनेश्वर महादेव मंदिर संस्थांचे ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रेरणेतून श्रीराम चरित्र कथा संपन्न होत आहे. या श्रीराम चरित्र कथा मध्ये भाविकांना ज्ञानाबरोबर, महाप्रसादाचा सुद्धा लाभ मिळत असून या सर्व संधीचा परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे संस्थांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया व कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रक्रिया उद्योगांना मोठे अनुदान

## १० टन क्षमतेचे तेल काढणी युनिट, मिनी ऑईल मिल, २५० मे. टन गोदाम व कडधान्य प्रक्रिया-पॅकेजिंग युनिटसाठी अर्जाची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सोयाबीन, मोहरी व इतर तेलबिया तसेच तूर, हरभरा आणि इतर कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करून स्थानिक पातळीवर मूल्यवर्धनाला चालना देण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्र शासनाच्या 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (-)' आणि 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान २०२६-२७ अंतर्गत काढणीपश्चात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले असून, पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. २५० मे. टन क्षमतेच्या गोदामासाठी १४.४० लाखांपर्यंत अनुदान तेलबियांच्या सुरक्षित साठवणुकीसाठी २५० मे. टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी मार्गदर्शक सूचनांनुसार प्रति मे.टन ११,५२१ रुपये खर्च निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार गोदामाचा एकूण अंदाजित खर्च २८ लाख ८० हजार २५० रुपये असून, पात्र लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेसाठी शेतकरी उत्पादक संस्था (/), सहकारी संस्था, सरकारी व खाजगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था () पात्र आहेत. मूल्य साखळी भागीदार () गटांना निवड प्रक्रियेत विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. लाभार्थ्यांची निवड 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' () या तत्त्वावर होणार असून, गोदामाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग () किंवा केंद्रीय वखार महामंडळ () यांच्या निकषांनुसार करणे बंधनकारक राहणार आहे. तेल काढणी युनिटसाठी ९.९० लाखांपर्यंत मदत तेलबिया प्रक्रियेसाठी आवश्यक यंत्रसामग्री व उपकरणांच्या खरेदीसाठी कृषी विभागाने स्वतंत्र अनुदानाची तरतूद केली आहे. १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तसेच लघु स्तरावरील प्रक्रिया उद्योगांसाठी मिनी ऑईल मिल आणि एक्सपेलर युनिटलाही आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. फिल्टर प्रेससह मिनी ऑईल मिलसाठी युनिट किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय मिनी ऑईल मिलसाठी ४० ते ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे.

या घटकासाठी वैयक्तिक शेतकरी, /, सहकारी संस्था, सार्वजनिक व खाजगी उद्योग, नोंदणीकृत नवीन तेल प्रक्रिया कंपन्या आणि मूल्य साखळी भागीदार पात्र आहेत. अनुदानाची गणना केवळ यंत्रसामग्री व उपकरणांच्या खर्चावर केली जाणार असून जमीन खरेदी, इमारत किंवा शेड बांधकामाचा खर्च ग्राह्य धरला जाणार नाही. सर्व यंत्रसामग्री अथवा समतुल्य गुणवत्ता मानकांची असणे आवश्यक आहे.

कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिटसाठी २५ लाखांपर्यंत अनुदान

तूर, हरभरा व इतर कडधान्यांवर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून ब्रँडिंग व विक्रीला चालना देण्यासाठी कडधान्य प्रक्रिया आणि पॅकेजिंग युनिट उभारणीसाठी एकूण प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे.

या अभियानांतर्गत प्रक्रिया युनिटसोबत साठवणूक सुविधेसाठीदेखील आर्थिक सहाय्य उपलब्ध राहणार आहे. मात्र इमारत अथवा गोदाम बांधकामासाठीचे अनुदान हे एकूण पात्र अनुदानाच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक नसावे, अशी अट घालण्यात आली आहे. , क्लस्टर स्तरावरील महासंघ (), प्राथमिक कृषी पतसंस्था () तसेच २१ वर्षांवरील वैयक्तिक उद्योजक या योजनेसाठी पात्र आहेत. संबंधित युनिटची किमान क्षमता ३०० किलो प्रतितास असणे आवश्यक असून नोंदणी आणि पर्यावरणीय नियमांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

बँक कर्ज आणि स्वतःचे भांडवल आवश्यक दोन्ही अभियानांतील अनुदान हे 'क्रेडिट लिंक्ड बॅक-एंडेड सबसिडी' स्वरूपातील असल्याने लाभार्थ्यांना बँक कर्ज घेणे आवश्यक आहे. तसेच एकूण प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम लाभार्थ्याने स्वतः उभारणे बंधनकारक आहे. प्रकल्प सुरू करण्यापूर्वी आणि पूर्ण झाल्यानंतर 'कृषी मॅपर' ॲपद्वारे जिओ-टॅगिंग करणे आवश्यक राहणार आहे. याशिवाय योजनेचा माहिती फलक प्रकल्पस्थळी लावणे बंधनकारक असून तेलबिया प्रक्रिया युनिट व गोदाम किमान पाच वर्षे तसेच कडधान्य प्रक्रिया युनिट किमान तीन वर्षे विक्री न करता कार्यान्वित ठेवावे लागणार आहे.

दुहेरी अनुदानास बंदी एकाच प्रकल्पासाठी दोन वेगवेगळ्या सरकारी योजनांमधून अनुदान घेता येणार नसल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

**महाराष्ट्र शासन**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय, भोकरदन**
**जुनी प्रशासकीय इमारत, जालना रोड, भोकरदन**
**(विभाग = भुसंपादन)**

संकेत स्थळ : www.jalna.nic.in | Email ID :- sdmbhokardan@gmail.com
फॅक्स क्रमांक : ०२४८५-२४४६०० | दुरध्वनी क्र. ०२४८५-२४४६००

जा.क्र. २०२६/उविअ/भुस/कावि | दिनांक : ०१/०६/२०२६

**उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी भोकरदन, यांच्येकडून भुमीसंपादन, पुर्नवसन व नुर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क नियम २०१३ चे कलम १९ (१) ची अधिसुचना**

**जा.क्र २०२६/उपविअ/भुसं/सिआर-१४/२०२१ दिनांक : ०१/०६/२०२६**

ज्याअर्थी समुचित शासन असलेल्या जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने, भुमिसंपादन, पुर्नवसन व पुर्नवसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम -२०१३ (२०१३चा ३०) यात यापुढे ज्यांच्या निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे. यांच्या कलम ११ च्या पोट कलमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या वापर करून, अधिसुचना दिनांक : ०२/०२/२०२६ अन्वये प्रारंभिक अधिसुचना काढली आहे. व शासन राजपत्रामध्ये दि.१९/०२/२०२६ रोजी प्रसिद्धी देण्यात आली आहे.

त्याद्वारे असे अधिसुचित केले आहे, की या सोबत जोडलेल्या अनुसुची एकमध्ये तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसुची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

जालना जिल्ह्याची जिल्हाधिकारी यांनी कलम -१५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणता ही असल्यास, विचारात घेतल्या नंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादीत करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्यांची खात्री पटली आहे. म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम-१९च्या पोटकलम (१) च्या तरतुदीमध्ये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषीत करण्यात येत आहे.

ज्याअर्थी अनुसुची तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाह योजनेच्या सारांश अनुसुची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३(छ) अन्वये सुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमामध्ये जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी भोकरदन यांना अधिसुचना काढण्यापुर्वी पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसुची -१**

**गावाचे नाव : भोकरदन शहर बाहढय वळण रस्ता**
**मौजे - भोकरदन ता. भोकरदन जि. जालना**

| अ.क्र | भुसंपादन किंवा गट नं | मोजणी प्रमाणे क्षेत्र ( हे. आर ) |
|---|---|---|
| १ | ६५ | ००.०१.६२ |
| २ | ६५ | ००.००.४८ |
| ३ | ६५ | ००.०१.७४ |
| ४ | ६५ | ००.००.१७ |
| ५ | ६५ | ००.०१.१३ |
| ६ | ६५ | ००.००.६० |
| ७ | ६५ | ००.००.३३ |
| ८ | ६५ | ००.००.४५ |
| ९ | ६५ | ००.००.३५ |
| १० | ६५ | ००.०१.५४ |
| ११ | ६५ | ००.००.५३ |
| १२ | ६५ | ००.००.४६ |
| १३ | ६५ | ००.००.५२ |
| १४ | ६५ | ००.०१.३५ |
| १५ | ६५ | ००.०१.७८ |
| १६ | ६५ | ००.०१.४१ |
| १७ | ६५ | ००.००.८३ |
| १८ | ६५ | ००.००.९६ |
| १९ | ६५ | ००.०१.३३ |
| २० | ७५ | ००.०१.५० |
| २१ | ६५ | ००.०२.०० |
| २२ | ६५ | ००.०५.०० |
| २३ | ६५ | ००.०४.७५ |
| २४ | ६५ | ००.१७.०० |
| २५ | ६५ | ००.१०.०० |
| २६ | ७३ | ००.०४.०० |
| २७ | ७३ | ००.०४.०० |
| २८ | ७३ | ००.०१.४० |
| २९ | ७३ | ००.०३.०० |
| ३० | ७३ | ००.०४.३५ |
| ३१ | ७३ | ००.०४.०० |
| ३२ | ७४ | ००.५६.०० |
| ३३ | ७४ | ००.०६.५० |
| ३४ | ७४ | ००.१०.५० |
| ३५ | ११९ | ००.२१.०० |
| ३६ | ११९ | ००.१०.०० |
| ३७ | ११९ | ००.०९.०० |
| ३८ | ११९ | ००.०५.०० |
| ३९ | ११९ | ००.०४.५० |
| ४० | ११९ | ००.०४.५० |
| ४१ | ११९ | ००.०४.५० |
| ४२ | ११९ | ००.१८.५० |
| ४३ | ११९ | ००.०५.०० |
| ४४ | ११९ | ००.०६.०० |
| ४५ | ११९ | ००.१०.५० |
| ४६ | ११८ | ००.५२.०० |
| ४७ | ९५ | ००.७९.०० |
| ४८ | ९५ | ००.०४.०० |
| ४९ | ६५ | ००.०१.३७ |
| ५० | ६५ | ००.००.३१ |
| ५१ | ६५ | ००.००.८१ |
| ५२ | ६५ | ००.०१.१३ |
| ५३ | ६५ | ००.००.६४ |
| ५४ | ६५ | ००.०१.१४ |
| ५५ | ६५ | ००.००.५७ |
| ५६ | ६५ | ००.०१.५५ |
| ५७ | ७८ | ००.१९.०० |
| ५८ | ७८ | ००.४१.५० |
| ५९ | ७८ | ००.२३.०० |
| ६० | ७९ | ००.४७.५० |
| ६१ | ७९ | ००.११.०० |
| ६२ | ७९ | ००.०६.०० |
| ६३ | ७९ | ००.०८.०० |
| ६४ | ७९ | ००.१८.०० |
| ६५ | ७९ | ००.२८.५० |
| ६६ | ८१ | ००.०१.०० |
| ६७ | ८१ | ००.२३.०० |
| ६८ | ८१ | ००.१७.५० |
| ६९ | ८१ | ००.०४.५० |
| ७० | ८१ | ००.०७.०० |
| ७१ | ८१ | ००.१०.५० |
| ७२ | ८८ | ००.४३.०० |
| ७३ | ९० | ००.१०.५० |
| ७४ | ९० | ००.०७.०० |
| ७५ | ९० | ००.१८.०० |
| ७६ | ९० | ००.१५.५० |
| ७७ | ९० | ००.०२.५० |
| ७८ | ९० | ००.११.५० |
| ७९ | ९० | ००.०७.५० |
| ८० | ९१ | ००.०२.०० |
| ८१ | ९१ | ००.३७.०० |

**अनुसुची -२**

प्रकल्पाचे नाव :- भोकरदन शहर करिता बाहय वळण रस्ता मौ. भोकरदन ता. भोकरदन जि. जालना करिता जमीन संपादना बाबत.

प्रकल्पकार्याचे वर्णन : भोकरदन शहर बाहय वळण रस्ता मौ. भोकरदन ता. भोकरदन जि. जालना येथील जमीन संपादना बाबत.

समाजास मिळणारे लाभ :- भोकरदन शहर बाहय वळणरस्ता मौ. भोकरदन या प्रकल्पामुळे शहरातील दळण वळण ची सुविधा सुरळीत होऊन, तसेच शहरातील होणारी वाहतुक कोंडी या पासुन नागरीकांना चांगली सुविधा व दळण वळण करण्या करिता मार्ग सुरळीत होईल.

**अनुसुचीः-३**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणेः-**

सदरचा प्रकल्प हा शहराच्या बाहय वळण रस्त्या करिता होत असल्यामुळे, बाधीत व्यक्तीचे विस्थापनाचा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यता नाही.

**अनुसुचीः-४**

**-: सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांशः-**

**:-लागु नाहीः-**

**टिपः-**

उक्त जमीनीचा नकाशाचे वर्णन उपविभागीय अधिकारी भोकरदन ता. भोकरदन जि. जालना यांचे कार्यालयात निरिक्षणा करिता ठेवण्यात आला आहे.

**ठिकाणः- भोकरदन**
**दिनांकः-०१/०६/२०२६**

**(बी.सरवनन) भा.प्र.से**
**सहाय्यक जिल्हाधिकारी तथा,**
**उपविभागीय अधिकारी भोकरदन**

**जा.क्र. जिमाका/जा/जाहि/२०२६/३३१ दिनांक : १० जून २०२६**

# सरसकट कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचा एल्गार; शासन निर्णयात बदल न झाल्यास २२ जूनला जालन्यात विराट मोर्चाचा इशारा

## जाचक अटी रद्द करा, दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करा; जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने' मधील अटी-शर्तींवर आक्षेप घेत जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सरसकट कर्जमाफीची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला आहे. शासनाने कर्जमाफीच्या निर्णयात तात्काळ बदल करून राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी लागू करावी, अन्यथा जिल्हाभर तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघटनांनी दिला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात शासन निर्णयातील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली आहे.

**कर्जमाफीच्या घोषणेनंतर शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या**

महाराष्ट्र विधानसभेच्या आर्थिक अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली होती. त्यानंतर २ जून २०२६ रोजी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' संदर्भातील शासन निर्णय जाहीर करण्यात आला.

मात्र या शासन निर्णयात काही विशिष्ट निकष आणि अटींचा समावेश करण्यात आल्याने राज्यातील लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता असल्याचा दावा शेतकरी प्रतिनिधींनी केला आहे.

**"सरसकट कर्जमाफीच हवी"**



निवेदनात म्हटले आहे की, शासनाने शेतकऱ्यांना कायमस्वरूपी कर्जमुक्त करण्याचे आश्वासन दिले असले तरी प्रत्यक्ष शासन निर्णयातील अटींमुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी वगळले जातील.

त्यामुळे कोणताही भेदभाव न करता राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी लागू करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शेतकरी नेत्यांच्या मते, सततची नापिकी, अवकाळी पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चातील वाढ आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत कर्जमाफी हीच मोठी दिलासा देणारी योजना ठरू शकते.

**ग्रामसभांमधून ठराव मंजूर करण्याची तयारी**

शासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण जालना जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत ग्रामसभा घेऊन सरसकट कर्जमाफीच्या समर्थनार्थ ठराव मंजूर करण्यात येणार असल्याचे शेतकरी प्रतिनिधींनी जाहीर केले आहे.

हे ठराव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासनाकडे पाठवण्यात येणार असून, लोकशाही मार्गाने सरकारवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**२२ जूनला विराट मोर्चाचा इशारा**

शेतकऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, शासन निर्णयात बदल न झाल्यास २२ जून रोजी जालना शहरात मोठा मोर्चा आणि आंदोलन करण्यात येणार आहे.

नियोजित कार्यक्रमानुसार अंबड चौफुली येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीत जिल्हाभरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे.

**शासन निर्णयाची होळी करण्याचा निर्धार**

मोर्चानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असून शासनाच्या कर्जमाफी निर्णयाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल. याचवेळी शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करण्यात येईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शेतकरी नेत्यांनी हा लढा केवळ जालना जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या हक्कांचा असल्याचे स्पष्ट केले आहे. *(पान २ वर)*

---

# जिल्ह्यात निर्यातवाढीसाठी दहा कलमी कृती आराखड्याच्या अंमलबजावणीवर भर

## जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेच्या बैठकीत विविध विषयांचा आढावा

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील निर्यात व उत्पादन क्षेत्राला चालना देऊन रोजगारनिर्मितीला गती देणे तसेच निर्यात वाढीसाठी जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या 'जिल्हा हे निर्यात केंद्र' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची बैठक सोमवारी (दि.९ जून) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यातील निर्यात वाढीसाठी विविध शासकीय विभाग, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार तसेच उद्योजक यांच्यात समन्वय साधून अडचणी दूर करण्यासाठी जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

या बैठकीत जिल्ह्याच्या निर्यातवाढीसाठी तयार करण्यात आलेल्या दहा कलमी कृती आराखड्याच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर, एनएचएलएमएलचे व्यवस्थापक विकास मलिक, एमआयडीसीच्या क्षेत्र व्यवस्थापक श्रीमती सुषमा नगरदेवळेकर, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक इंद्रजीत साळवे, लघु उद्योग भारतीचे सचिव राजेश अग्रवाल, जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक मंगेश केदार, इंडस्ट्रीज इंटरप्रिन्यूअर्स असोसिएशनचे सचिव अर्जुन गेही, एमएसएमई-डीएफओचे सहाय्यक संचालक राहुल कुमार मिश्रा यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी जिल्हास्तरीय निर्यात धोरण आराखडा तयार करणे, वार्षिक दुहेरी अंकी निर्यातवाढ साध्य करण्यासाठी विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, संभाव्य निर्यातक्षम उत्पादनांची ओळख, प्रतिष्ठित व्यवस्थापन, डिझाईन, संशोधन व विकास संस्थांशी संस्थात्मक संबंध प्रस्थापित करणे, एमएसएमई उद्योजकांना जागतिक ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मची माहिती देण्यासाठी कार्यशाळा व प्रदर्शनांचे आयोजन आदी विषयांवर चर्चा झाली.

तसेच निर्यातदारांना प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १६ व १७ जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'रिव्हर्स बायर-सेलर मिट' संदर्भात *(पान २ वर)*

# टेंभुर्णी हमालांची व्यापारी महासंघाकडे मागणी, हमालीचे दर वाढवावे



**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील हमालांनी व्यापारी महासंघाच्या अध्यक्षांना, एका निवेदनाद्वारे हमाली वाढवावी अशी मागणी केली आहे. महागाईच्या काळात जे दर आहे ते हमालाना परवडत नाही, त्यामुळे हे सद्यस्थितीचे दर वाढवून मिळावेत. सद्यस्थितीत अलपदर असल्यामुळे महागाईच्या काळात हे अल्प दर पुरत नाही. त्यामुळे आम्ही विनंती करीत आहोत की आम्ही पुढील प्रमाणे मागणीचे दर वाढवित आहोत ते वाढून मिळावे. त्याप्रमाणे आम्हाला खत सिमेंट भुसार कट्ट्याचे दर खालील प्रमाणे देण्यात यावे. प्रति टन ८० रुपये भाव असावा. आतील हमाली प्रतिष्ठान साठ रुपये असावी. सिमेंट व खत कोणी दहा रुपये प्रमाणे असावी. आमच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा त्यासाठी आपण स्वतः प्रयत्न करावे. आमच्या मागणीचा सार्वतीपूर्वक विचार न झाल्यास आमच्यातर्फे बहिष्कार व आंदोलनाचे अस्त्र उभारल्या जाईल. यावर हमालांचे प्रमुख मुजाहिद शेख रफिक, व समाधान प्रल्हाद नाटेकर यांच्यासह अनेक आम्हालांच्या सह्या आहेत.

---

# पत्रकारांचे हक्काचे व्यासपीठ, पत्रकार भवन व्हावे - पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश भारद्वाज

**दत्ता देशमुख**



पत्रकार भवन ही काळाची गरज "पत्रकार हे समाज आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. पत्रकार परिषद, बैठका, प्रशिक्षण कार्यशाळा आणि सामाजिक उपक्रमांसाठी स्वतंत्र पत्रकार भवनाची नितांत गरज आहे. जाफ्राबाद येथे पत्रकार भवन उभारल्यास पत्रकारांना हक्काचे व्यासपीठ मिळेल आणि पत्रकारितेच्या विकासाला चालना मिळेल. शासनाने या मागणीची दखल घेऊन जागा व निधी उपलब्ध करून द्यावा. पत्रकार भवन हे पत्रकारांच्या एकतेचे, सन्मानाचे आणि लोकशाही मूल्यांच्या जतनाचे केंद्र ठरेल." मुकेश भरद्वाज, तालुकाध्यक्ष, मराठी पत्रकार संघ, जाफ्राबाद

जाफ्राबाद तालुक्यातील पत्रकारांसाठी स्वतंत्र पत्रकार भवन उभारण्यात यावे, अशी मागणी पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते मिळावे, त्यांच्या बौद्धिक व व्यावसायिक आणि विविध संघटनांकडून होत आहे. विकासाला चालना मिळावी तसेच पत्रकार पत्रकार परिषद, बैठका, प्रशिक्षण कार्यक्रम कल्याणाशी संबंधित उपक्रम प्रभावीपणे आणि सामाजिक उपक्रमांसाठी राबविता यावेत, यासाठी पत्रकार भवन कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध व्हावी, उभारणे आवश्यक असल्याची भावना यासाठी पत्रकार भवनाची गरज व्यक्त केली व्यक्त होत आहे. राज्यातील अनेक ठिकाणी जात आहे. पत्रकार हे लोकशाहीचा चौथा पत्रकार भवन व पत्रकारांसाठी विविध *(पान २ वर)*

# डॉ.ढाकणे परिचर्या महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन

**जालना - प्रतिनिधी**

रोहणवाडी येथील डॉ.सुभाषराव ढाकणे कॉलेज ऑफ बी.एस्सी नर्सिंग येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.डॉ.प्रदीप हुशे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले व विद्यापीठ गीत गाण्यात आले.ॲड.गजानन मांटे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिक नीती,मूल्ये व वेळेचे महत्व सांगितले.प्रशासकीय अधिकारी प्रा.शरद कवानकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्राचार्य डॉ.श्रीनाथ कुलकर्णी,उपप्राचार्य पुरुषोत्तम गायकवाड,प्रा.आशिष ढिल्पे,प्रा.अक्षय खरे,प्रा.प्रफुल्ल गायकवाड,प्रा.सौरभ तांबे,प्रा.राजकन्या कोरडे,प्रा.अतुल थोरात, प्रा.कोमल इंगोले,प्रा.रिया सावळे,प्रा.निकिता श्रीसुंदर,प्रा.मालिनी बत्तीसे,प्रा.अनिकेत नागरे,ग्रंथपाल सौरभ बनछोड व बी एस्सी नर्सिंग चे विद्यार्थी उपस्थित होते.

# पुनर्वशीत जाफराबाद साठी बस थांबा आहे, पाटी आहे, एस टी महामंडळाची बस थांबतच नाही; बस थांबेल ही अपेक्षा नागरिकांची मागणी

**दत्ता देशमुख**

भोकरदन रोडवरील पुनर्वसन जाफ्राबाद परिसरातील बसथांब्यावर अनेक एसटी बस थांबत नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. बसथांबा असूनही नागरिकांना रस्त्याच्या कडेला उभे राहून बसची वाट पाहावी लागत असल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी केली आहे.

पुनर्वसन परिसरात मोठ्या प्रमाणावर वस्ती असून विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच कामानिमित्त दररोज प्रवास करणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. या प्रवाशांच्या सोयीसाठी बसथांबा उभारण्यात आला असला तरी



बहुतांश बस येथे न थांबता पुढे जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

विशेषतः शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी आणि महिलांना याचा अधिक फटका बसत आहे. बसथांब्याचा उद्देश प्रवाशांना सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे हा असताना, बस न थांबल्यामुळे या सुविधेचा

**लाभ मिळत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने या सम स्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन पुनर्वसन बसथांब्यावर संबंधित बस नियमित *(पान २ वर)*

---

# नगरपंचायत न होताच, ग्रामपंचायत च्या निवडणुकीचे लागले वेध - जनार्दन झोरे

## नगरपंचायत साठी गावकऱ्यांनाच घेऊन आवर्जून प्रयत्न करणार, १२ जून रोजी विशेष सभा

**दत्ता देशमुख**

जालना जिल्ह्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी ग्रामपंचायतीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. प्रभाग रचना आणि आरक्षण प्रक्रियेसाठी १२ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या निवडणुकीत थेट जनतेतून सरपंच निवडला जाणार असून, १७ऐवजी १८ सदस्य असणार आहेत.

टेंभुर्णीकरांनी गावाची नगरपंचायत व्हावी, अशी जोरदार मागणी केली होती. मात्र, राजकीय हस्तक्षेप, शासकीय दप्तरदिरंगाई आणि सत्ताधारी पक्षाच्या स्वार्थामुळे नगरपंचायतीचे स्वप्न भंग पावल्याची भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. या



राजकीय हस्तक्षेपावर स्थानिक पुढाऱ्यांनी खंत व्यक्त केली आहे. पैशांची देवाणघेवाण आणि बाहेरच्या हस्तक्षेपाने गावातील एकोपा बिघडून गटतट निर्माण होण्याची भीती राजकीय जाणकारांकडून वर्तवली जात आहे. नगरपंचायत न होताच ग्रामपंचायत च्या आरक्षण निवडीचा कार्यक्रम घोषित झाला आहे.

निवडणुका येतात आणि जातात, मात्र गावातील शांतता भंग पावून मतभेद होऊ नयेत, यासाठी टेंभुर्णीकरांनी आतापर्यंतचा इतिहास जपला आहे.

**लढा उभारणार**

नगरपंचायत व्हावी, हा सर्व गावकऱ्यांचा ठराव होता. परंतु, शासकीय अडचणी आणि राजकीय अडकाठीमुळे आम्ही सध्या हा निर्णय शांतपणे स्वीकारला आहे. यापुढे या प्रश्नावर मोठ्या प्रमाणावर लढा उभा करू, सर्व गावकऱ्यांना विश्वासात घेऊन नगरपंचायत चे धोरण राबवण्यासाठी आम्ही गावकरी आणि गावकऱ्यांतर्फेच लढा उभारल्या जाऊ जाणार. माझ्यासाठी गावकऱ्यांसाठी हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न असून, गावच्या विकासासाठी शहरीकरण होणं गरजेचं आहे आणि त्यासाठी अमाप निधी येत असतो तो निधी गावकऱ्यांसाठीच खर्च झाला पाहिजे यावर आमची भूमिका ठाम आहे. त्यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार आता झेंडा घेणार गावकऱ्यांसाठी काहीही करायला तयार आहे. नुसते विकासाचे झेंडे हातात घेण्यापेक्षा विकास करून दाखवणार ही माझी भूमिका आहे असे जनार्दन झोरे यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. राजकीय रंग लागल्याने झालेले सामाजिक नुकसान पाहता, यंदा मनभेद होऊ न देण्याची काळजी घ्यावी लागेल, अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे. जर यावेळी नगरपंचायत झाली नाही, तर शासनाकडे पुन् हा दाद मागण्यासाठी आणि योग्य निर्णय

**राजकारण फक्त निवडणुकीपुरते**

आम्ही सत्ताधारी पक्षाचे नेतृत्व करत असलो तरी, नगरपंचायत झाली असती तर आम्हालाही आनंदच झाला असता. मात्र, यात नेमकी कोणाची अडकाठी आली, हे कळू शकले नाही. आम्ही राजकारण फक्त निवडणुकीपुरते मर्यादित ठेवतो, निवडणूक संपली की सर्वजण पुन्हा मित्र म्हणूनच राहतो.

*- एक सामाजिक कार्यकर्ता*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.